




दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७




● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार १९ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# ५ वर्षांसाठी १०० दिवसांचा रोडमॅप द्या मोदींनी घेतली मंत्र्यांची शाळा

## निवडणूक आयोगाने देशातील सात टप्प्यातील सार्वत्रिक निवडणुका तसेच विधानसभा आणि पोटनिवडणुकांचे मॅरेथॉन वेळापत्रक जाहीर केलं.

**वादळ वार्ता / दिल्ली**



निवडणूक आयोगाने देशातील सात टप्प्यातील सार्वत्रिक निवडणुका तसेच विधानसभा आणि पोटनिवडणुकांचे मॅरेथॉन वेळापत्रक जाहीर केलेय. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रिमंडळाची बैठक घेतली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढील पाच वर्षांसाठी 100 दिवसांचा रोडमॅप तयार करण्यास सांगितले आहे. नवी दिल्लीत आज सकाळी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. यावेळी त्यांनी मंत्र्यांना आपापल्या मंत्रालयातील सचिव आणि इतर अधिकाऱ्यांची भेट घेण्यास सांगितले. तसेच नवीन सरकारचे पहिले 100 दिवस आणि पुढील 5 वर्षांचा अजेंडा अधिक चांगल्या प्रकारे कसा राबवता येईल यावर चर्चा करण्यास सांगितले मंत्रिमंडळाने निवडणूक आयोगाच्या शिफारसी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पाठवून 7 टप्प्यातील संसदीय निवडणुकांच्या तारखा अधिसूचित करण्याची प्रक्रियाही सुरू केली. पहिल्या टप्प्यात 102 जागांवर 19 एप्रिल रोजी मतदान होणार असल्याची माहिती आहे.यासाठी पहिली अधिसूचना 20 मार्च रोजी जारी केली जाणार आहे.

आगामी लोकसभा निवडणुकीत एनडीएसाठी '400 पार' आणि एकट्या भाजपसाठी 370+ हे लक्ष्य ठेवून नरेंद्र मोदींनी आता विकसित भारत रोडमॅपवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी देशवासियांना एक पत्र जारी करून 2047 पर्यंत विकसित भारतासाठी कल्पना आणि सूचना मागवल्या आहेत

## कोयता गँगमध्ये वर्चस्वाची लढाई, म्होरक्याची कोयत्यानेच हत्या

**दैनिक वादळ वार्ता**

पुणे शहराप्रमाणे जिल्ह्यात कोयता गँगने दहशत निर्माण केली आहे. पुण्यातील इंदापूरमध्ये शनिवारी धक्कादायक घटना घडली होती. कोयता गँगचा म्होरक्या असलेल्या अविनाश धनवे हा हॉटेलमध्ये जेवणासाठी बसला असताना त्याची हत्या झाली. आधी त्याच्यावर गोळ्या चालवण्यात आल्या. त्यानंतर कोयत्याने त्याची हत्या करण्यात आली. अविनाश धनवे हा कोयता गँगचा आळंदीमधील म्होरक्या होता. त्याचा अंत कोयत्यानेच झाला. दरम्यान या प्रकरणी धनवे यांच्या पत्नीच्या फिर्यादीवरून 10 जणांविरोधात इंदापूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कशी झाली होती हत्या



पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील इंदापूर बाह्यवळणावर हॉटेल जगदंबा आहे. या हॉटेलमध्ये शनिवारी रात्री ८ वाजता अविनाश धनवे इतर तिघे जेवणासाठी आले होते. त्यांनी जेवणाची ऑर्डर दिल्यावर ते गप्पा मारु लागले होते. यावेळी दोन युवक हॉटेलमध्ये घुसले. त्यांनी पिस्तूल काढून अविनाशवर गोळ्या चालवल्या. त्यानंतर आणखी काही जण हॉटेलमध्ये घुसले. त्यांनी अविनाशवर सपासप कोयत्याने वार केले. ही घटना सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाली आहे दहा जणांवर गुन्हा दाखलअविनाश धनवे हत्या प्रकरणात दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात खुशाल तापकिर, विशाल तापकिर (दोघे रा. आळंदी, ता. हवेली), मयुर पाटोळे (रा. वडमुखवाडी, आळंदी, ता. हवेली), राहुल चव्हाण, देवा सुतार, मयुर मानकर, शिवा बेडेकर, प्रकाश उर्फ पप्पु बनकर (सर्व रा. आळंदी, ता. हवेली), सतिष पांडे, प्रणिल उर्फ बंटी मोहन काकडे (रा. फलटण, ता. सातारा) यांचा समावेश आहे.

## राणीच्या बागेत वर्षभरात ४७ प्राण्यांचा मृत्यू

**वादळवार्ता/मुंबई**

दक्षिण मुंबईतील वीर जिजामाता उद्यान अर्थात राणीच्या बागेतून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. गेल्या वर्षभरात राणीच्या बागेत तब्बल 47 प्राण्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आली आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे त्यापैकी तब्बल 30 प्राण्यांचा मृत्यू हा हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे त्यामुळे उद्यानातील प्राण्यांच्या देखरेखीवर आणि सोयी-सुविधांबाबत प्राणी प्रेमींकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. देशभरातील प्राणिसंग्रहायलयातील पक्षी आणि प्राणी यांच्याबाबतचा अहवाल नुकताच केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाने प्रसिद्ध केला आहे. यामध्ये २०२२-२३ या वार्षिक अहवालात कोणत्या प्राण्यांचा मृत्यू कोणत्या आजारामुळे झाला याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. यामध्ये राणीच्या बागेतील काही प्राण्यांचा मृत्यू हा हृदयविकाराचा धटका, श्वसनक्रिया बंद होणे आणि अनेक अवयव निकामी होणे यामुळे झाल्याची माहिती अहवालातून समोर आली आहे. तसेच पोपट आफ्रिकन ग्रे, कॉकॅटियल बडेरिगर, सांबर हरण, बडेरिगर, मॅकॉ मिलिटरी, तीतर गोल्डन, भारतीय फ्लॅपशेल, कासव, गोल्डन जॅकल, इमू इत्यादींचाही समावेश आहे. वृद्धापकाळाने सर्वात कमी मृत्यू झाले




## पत्रकार भारत कवितके यांची राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ करीता निवड.

**दैनिक वादळ**

भारत कवितके मुंबई कांदिवली. मुंबई मधील कांदिवली उपनगरातील जेष्ठ पत्रकार साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांची साप्ताहिक धनगर शक्ती कडून उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ करीता नुकतीच निवड करण्यात आली असल्याचे सा.धनगर शक्ती वृत्तपत्र/युट्यूब चैनल चे संपादक आकाश पुजारी यांनी भारत कवितके यांना निवड पत्र देऊन कळविले आहे.शुक्रवार दिनांक २२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता सेलिब्रिशन बंक्वेट सभागृह, नविन बस स्टँड समोर, देहू फाटा, पुणे या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते राज्य स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ देऊन भारत कवितके यांना सन्मानित करण्यात येणार आहे.पत्रकारिता क्षेत्रात गेल्या काही वर्षांतील सातत्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल आम्ही सा.धनगर शक्ती वृत्तपत्र व युट्यूब चैनल कडून भारत कवितके यांना राज्य स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आला असल्याचे संपादक आकाश पुजारी यांनी कळविले आहे.धनगर समाजातील मानबिंदू असलेल्या अरळी,ता. मंगळवेढा, जिल्हा सोलापूर येथून प्रकाशित होत असलेले भारत सरकार नोंदणीकृत असलेले धनगर शक्तीने प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक मिडिया मध्ये आपला वेगळा ठसा उमटविला आहे.दोन सत्रात चालणाऱ्या या कार्यक्रमात पहिल्या सत्रात मान्यवरांचे हस्ते पुरस्कार मानकरींना पुरस्काराचे वितरण करण्यात येईल.तर दुसऱ्या सत्रात प्रिंट मीडिया मध्ये बातमी लेखनाचे सहा मुद्दे, हेडलाईन,सब हेडलाईन,चौकट बातमी, परिच्छेद यावर मार्गदर्शन केले जाईल.व इलेक्ट्रॉनिक मिडिया या मध्ये प्राथमिक माहिती, शुटिंग कसे करावे? ( कॅमेरा, मोबाईल), बातमी पूर्वी आपला परिचय कसा द्यावा? मुलाखत कशी घ्यावी, प्रश्न कसे काढावे? आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.पत्रकारिता क्षेत्रातील भरीव कामगिरी साठी भारत कवितके यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. भारत कवितके यांची आजवर पत्रकारिता, साहित्य व सामाजिक क्षेत्रातील विशेष कामगिरी बद्दल मिळालेल्या पुरस्कारांची संख्या १०४७ झाली असल्याचे भारत कवितके यांनी सांगितले आहे. कृतीशील, क्रियाशील, प्रामाणिक आणि पारदर्शक पत्रकारिता करुन भारत कवितके यांनी आजवर आपल्या लेखणीच्या माध्यमातून अनेक जटिल समस्या सोडविल्या आहेत.महानगर पालिका, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ च्या समस्या, झोपडपट्टी मधील समस्या, शासनाच्या विविध योजनांचा जनतेला मिळणारा लाभ, अनेक गोरगरिबांना आर्थिक शैक्षणिक लाभ मिळवून दिला.विशेष करून धनगर समाजा बाबत भारत कवितके यांनी सातत्याने लिखाण करून समाज जनजागृती निर्माण केली.फक्त बातमी लिहून न थांबता त्या बातमी करीता पाठपुरावा केला आणि समस्या सोडविल्या.भारत कवितके यांचे विविध वृत्तपत्रे युट्यूब चैनल संपादकांशी अत्यंत सलोख्याचे संबंध आहेत.हा पुरस्कार जाहीर होताच विविध स्तरांतून भारत कवितके यांचे वर अभिनंदन व शुभेच्छा चा वर्षाव होत आहे.



## लोकसभा निवडणूक

### विजय शिवतार विरुद्ध अजित पवार वाद अजूनही शांत नाही



अजित पवारांविरोधात आक्रमक झालेल्या विजय शिवतारे यांना मुख्यमंत्री शिंदेंनी शांत करण्याचा प्रयत्न केलाय. पण मुख्यमंत्र्यांना भेटून आल्यानंतर पुन्हा शिवतारेंनी अजित पवारांच्या शाब्दिक फायरिंग केली आहे. बारामतीत अजित पवारांच्या विरोधात दंड थोपटल्यानंतर, दुसऱ्यांदा मुख्यमंत्री शिंदेंनी शिवतारेंना बोलावलं. आपल्याला मुख्यमंत्र्यांनी युती धर्माचं पालन करण्यास सांगितलं. पण त्यावर आपण 4-5 दिवसांत कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय घेणार असं शिवतारे म्हणाले आहेत. मुख्यमंत्री शिंदेंच्या शब्दाच्या पलिकडे जाणार नाही, असं शिवतारे म्हणत आहेत. म्हणजेच बारामतीतून शिवतारे माघार घेणार अशी दाट शक्यता आहे.

### महायुतीच्या जागावाटपाचा वाद चव्हाट्यावर, नाशिकमध्ये




नाशिकमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांनी भाजप कार्यालयात ठिय्या मांडला. नाशिकची जागा भाजपला सोडण्याच यावी, अशी घोषणाबाजी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या कार्यालयात केली आहे. भाजप पदाधिकाऱ्यांच्या घोषणाबाजीचा एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओत भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते जोरजोरात घोषणाबाजी करुन नाशिक लोकसभेची जागा शिवसेना ऐवजी भाजपला मिळावी, अशी मागणी करताना दिसत आहेत. या व्हिडीओमुळे महायुतीतील जागावाटपाचा वाद आता चव्हाट्यावर आला आहे.

### राज ठाकरे दिल्लीला रवाना, महाराष्ट्राच्या राजकारणात ट्विस्ट




महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे दिल्लीला रवाना झाले आहेत. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील भाजपचे दिग्गज नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील दिल्लीला रवाना झाले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज ठाकरे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत महायुतीत सहभागी होण्याबाबत चर्चा करण्यासाठी दिल्लीला रवाना झाले आहेत. राज ठाकरे, त्यांचे चिरंजीव अमित ठाकरे यांच्यासह सचिन मोरे, हर्षल देशपांडे आणि राज ठाकरे यांचे मित्र हे चार्टड विमानाने दिल्लीला रवाना झाल्याची माहिती सूत्रांनी दिली

## यशोधरा बुद्धविहार माजलगाव च्या वतीने श्रीलंकेला धम्म पर्यटना साठी जाणाऱ्या बौद्ध उपासक-उपासिकांना दिल्या शुभेच्छा.

**वादळवार्त**

दि.18 मार्च 2024 रोजी यशोधरा बुद्धविहार, फुलेनगर, माजलगाव येथे श्रीलंकेला जाणाऱ्या धम्म उपासक-उपासिकांना यशोधरा बुद्धविहाराच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. पूजनीय भदंत उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली या धम्मसहलीचे आयोजन करण्यात आले आहे. यशोधरा बुद्धविहारात सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन करून त्रिशरण पंचशील घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.श्रीलंकेला जाणारे बौद्ध उपासक-उपासिका पुढील प्रमाणे आहेत, भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा आयु.कमलताई डोंगरे व यशोधरा बुद्धविहाराच्या उपाध्यक्षा आयु.सुशिलाताई चांदमारे,हरिबाई टाकणखार,शकुंतला मस्के,शारदाताई घोडके,श्रीमंतराव डोंगरे,प्रा.लक्ष्मणराव मस्के इ.

बौद्ध उपासक-उपासिकांचे शाल,पुष्पगुच्छ व हार देऊन स्वागत करण्यात आले व सर्वांना पुढील प्रवासा करिता शुभेच्छा देण्यात आल्या. धम्म सहल माजलगाव मार्गे मानवत रोड,पूर्णा-परभणी, सिकंदराबाद, चेन्नई पर्यंत रेल्वेने प्रवास होईल व चेन्नईतुन विमानाद्वारे श्रीलंकेला मार्गस्थ होतील, श्रीलंकेतील सर्व बौद्ध स्थळांना भेट देणार आहेत एकूण दहा दिवसांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच यापूर्वी थायलंड येथे धम्मपर्यटन करून आलेले लक्ष्मण सहजराव व वेणूताई माने यांचा देखील सत्कार करण्यात आला.बचुते सर व बनसोडे सर यांच्या वतीने देखील धम्मपर्यटनासाठी जाणाऱ्या उपासकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विशेष असा सत्कार माजलगाव नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक (ओ. एस.) डोंगरे साहेब यांची मेहकर या ठिकाणी नुकतीच बदली झाली असून त्यांचा सपत्नीक सत्कार यशोधरा बुद्धविहाराच्या वतीने करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी भिमराव बचुटे सर,बनसोडे सर,हजारे साहेब, सुधाकर बापू उजगरे व माजलगाव नगर परिषदेचे कर्मचारी, तसेच परिसरातील उजगरे



अक्का,सीताबाई जाधव,शरदाबाई साळवे,सीताबाई खळगे,आदित्य जाधव,सम्यका जाधव, सम्मीका डोंगरे,सानिका जाधव इ. उपस्थित होते. यशोधरा बुद्धविहाराच्या उपाध्यक्षा सुशिलाताई चांदमारे, सचिव बाबासाहेब जाधव विश्वस्त मस्के सर, सुधाकर वाघमारे, यांच्या वतीने सर्वांचे स्वागत करण्यात आले. व पुढील धम्म पर्यटनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशोधरा बुद्धविहाराचे अध्यक्ष प्रा.आर.एम. कांबळे सर यांचे मार्गदर्शन लाभले

## संपादकीय

# अरे वाचवारे, चिमणी पाखरे!

चीनने सन १९५८-६२च्या दरम्यान चार कीटक मोहीम राबवली त्यात त्यांनी पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजेच उंदीर, माश्या, डास आणि चिमण्या हे चार कीटक नष्ट करायचे ठरवले. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या काळात सुरू झालेल्या या चिमण्या मारण्याच्या अभियानमुळे चीनमध्ये चिमण्या जवळजवळ संपुष्टात आल्या, ज्याचा परिणाम गंभीर पर्यावरणीय असंतुलनात झाला, पुढची बरीच वर्षे चीनमधील लोकांना भयंकर उपासमारीला सामोरे जावे लागले. परंतु त्यामुळे पर्यावरणापुढे उभे राहू शकणारे धोके लक्षात आले. त्यानंतर अनेक वर्षांनी जगभरात, तज्ज्ञांच्या अभ्यासाअंती 'चिमणी जगायला हवी' याची जाणीव निर्माण झाली. जगभरात २६ जातीच्या चिमण्यांची नोंद आहे. मात्र या २६ पैकी फक्त २३ चिमण्यांची छायाचित्र सध्या उपलब्ध आहेत. श्रीकृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा हा समस्त मानवजातीला सावध करणारा महत्त्वपूर्ण संकलित लेख... संपादक.

जागतिक चिमणी दिन- वर्ल्ड स्पॅरो डे हा २० मार्च रोजी पाळला जातो. पहिला जागतिक चिमणी दिवस हा दि.२० मार्च २०१० रोजी साजरा करण्यात आला. आज चिमण्यांची संख्या कमी होत चालली आहे. खरं म्हणजे भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, विणीचा हंगाम वर्षभर असू शकणारा, माणसाच्या जवळपास राहणारा आणि त्यामुळे नेहमी दिसणारा पक्षी अशी चिमणीची ओळख आहे. परंतु दिवसेंदिवस होत चालल्या बदलामुळे आता चिमण्यांच्या वास्तव्याला धोखा निर्माण झाला आहे. यासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातोय. भारतात पाच प्रजातींच्या चिमण्या आढळून येतात. त्यामध्ये, स्थलांतर करणाऱ्या प्रजातींचादेखील समावेश आहे. याशिवाय, जगातही २४ प्रकारच्या चिमण्या आढळून येतात. यापैकी बहुतांश प्रजातींची कोणतीही आकडेवारी उपलब्ध नाही. २०२०मध्ये गुजरातच्या गांधीनगर येथे झालेल्या १३व्या संयुक्त राष्ट्र प्रवासी पक्षी प्रजाती संवर्धन परिषदेत भारतातील पक्ष्यांची सध्याची स्थितीवरील 'स्टेट ऑफ इंडियाज बर्ड' अहवाल प्रकाशित करण्यात आला. देशभरातील दोन सरकारी आणि सहा स्वयंसेवी संस्था आणि अनेक पक्षी निरीक्षकांनी 'सिटिझन सायन्स' या संकल्पनेचा वापर करून हा अहवाल तयार केला आहे. पंधरा हजार पाचशे पक्षी निरीक्षकांच्या सुमारे एक कोटी निरीक्षणांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला. प्रकाशित अहवालात पक्षांच्या ८६७ प्रजातींचा समावेश करण्यात आला होता. या अहवालामध्ये असे म्हटले आहे की गेल्या २५ वर्षात आतापर्यंतची पक्षांच्या संख्येत सर्वात मोठी घट नोंदविली गेली आले. गेल्या पाच वर्षात पक्ष्यांच्या संख्येत तब्बल ७९% घट झाल्याचेही या अहवालात म्हटले आहे. त्यातही कीटकभक्ष्यी असलेल्या चिमणीसारख्या पक्षांची संख्या कमी होणे, हे मानवासाठी धोकादायक असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. ८६७ पैकी १२६ प्रजाती अशा आहेत ज्यांचे प्रमाण स्थिर स्वरूपात असल्याचे आढळून आले आहे आणि काही ठिकाणी वाढलेलीही दिसते. मात्र, १०१ पक्ष्यांच्या प्रजातींच्या संवर्धनासाठी ताबडतोब प्रयत्न करण्याची गरज आहे, ज्यामध्ये चिमणी या पक्षाचा समावेश आहे. चिमण्यांची संख्या शहरी भागातून मोठ्या प्रमाणात कमी झाली असून ग्रामीण भागातही चिमण्यांचे प्रमाण कमी होत चालल्याचे या अहवालात म्हटले आहे.

गेल्या २५ वर्षांत सर्वाधिक घट झालेल्या पक्ष्यांच्या प्रजाती- १) पांढऱ्या पुठ्ठ्याचे गिधाड (व्हाईट रम्पड् व्हल्चर), २) रिचर्डची चिमणी (रिचर्ड्स पिपिट), ३) भारतीय गिधाड (इंडियन व्हल्चर), ४) सोन चिखल्या (पॅसिफिक गोल्डन प्लोवर), ५) बाकचोच तुतारी (कल्क्यू सॅण्डपायपर). चिमण्यांची घटती संख्या हा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा घटक आहे. चिमण्यांची संख्या झपाट्याने कमी होत असल्यामुळे याचे अनेक गंभीर परिणाम हे विविध परिसंस्थांवर दिसून येत आहेत. चिमण्यांची संख्या कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम हा शेतातील पिकांवर झाला आहे. पिकांवर पडणाऱ्या रोगराईचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किडे चिमण्या खात असत. मात्र आता चिमण्यांची संख्या कमी झाल्याने पिकांवर पडणाऱ्या अळ्या, किड्यांचा उपद्रव अधिक वाढला आहे, परिणामी पिकांचा उतारा देखील कमी होत आहे. यावर उपाय म्हणून पिकांवर आरोग्यासाठी हानीकारक असलेल्या किटक नाशकांचा वापर केला जात आहे.

चिमण्या कमी होण्याची कारणे- १. उद्योगीकरणामुळे वातावरणात झालेला बदल आणि वाढते प्रदूषण. २. शहरीकरण व लोकांचे बदलते राहणीमान, फ्लॅट संस्कृतीतील सिमेंटची घरे यामुळे चिमण्या आपली घरे बनवू शकत नाहीयेत.

# महाडच्या मुक्तिसंग्राम काय शिकवितो?

दलित महिलांचा मोठा सहभाग आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांचे जीवतोड आवाहन या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये ठरले. या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना खास आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज उरली नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्यास सुचविले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली. कृगोनि- श्री कृ. गो. निकोडे यांनी लेखात रेखाटलेली ही माहिती... संपादक.

महाड सत्याग्रह हा दि.२० मार्च १९२७ रोजी विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील महाड येथील सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी अस्पृश्यांना घेता यावे, म्हणून केलेला हा सत्याग्रह होता. यामुळेच २० मार्च हा दिवस सामाजिक सबलीकरण दिन म्हणून भारतात साजरा केला जातो. महामानव डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली लोकांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन केलेली ही पहिली सामायिक कृती होती. या सत्याग्रहास महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह, महाडचा मुक्तिसंग्राम किंवा महाडची सामाजिक क्रांती म्हणूनही ओळखले जाते.

भारतीय जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांना उच्च जातीय हिंदूंपासून वेगळे ठेवण्यात आलेले होते. अस्पृश्यांना पाण्याच्या मुख्य स्त्रोतामधून पाणी घेण्यास तसेच मुख्य रस्त्यावरून चालण्यास परवानगी नव्हती. ऑगस्ट १९२३मध्ये मुंबई कायदे मंडळाने एक निर्णय पारित केला, त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या आणि सुस्थितीत ठेवलेल्या सर्व मालमत्तेवर सर्वांना म्हणजेच अस्पृश्यांनाही वहिवाटीचा हक्क असेल. महाडच्या नगरपालिकेनेही जानेवारी १९२४ साली या कायद्याची अंमलबजावणी करणारा निर्णय पारित केला, परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालीच नाही. सुरेंद्रनाथ टिपणीस, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे व अनंत विनायक चित्रे यांच्यासह अन्य पुरोगामी सामाजिक कार्यकर्ते व सहयोगी महाड सत्याग्रह दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मदत करण्याचे काम करीत होते. कोकणातील महाड हे शहर सत्याग्रहासाठी निवडले गेले, कारण उच्च जातीय हिंदूंनी हे धोरण प्रत्यक्षात आणण्यासाठी तयारी दाखवली होती. त्यामध्ये अनंत विनायक चित्रे, गंगाधर नीलकंठ सहस्त्रबुद्धे, सुरेंद्रनाथ टिपणीस हे महाड नगरपालिकेचे प्रमुखही त्यांत सहभागी होते. सन १९२७ साली सुरेंद्रनाथ टिपणीसांनी नगरपालिकेचे प्रमुख म्हणून सर्व सरकारी संपत्ती- सार्वजनिक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुली केली आणि त्यानिमित्ताने डॉ.आंबेडकरांना सभा घेण्यासाठी आमंत्रण दिले. सभेनंतर सर्वजण चवदार तळ्याकडे गेले. त्यांनी सर्वात प्रथम त्या तळ्यांमधून पाणी प्यायले आणि त्यानंतर जमलेल्या सर्व लोकांनीही त्या तळ्याचे पाणी प्राशन केले. त्यावेळी स्त्री-पुरुष मिळून सुमारे पाच हजार जण या सभेसाठी व नंतर चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी आलेले होते. त्यातील पुरुष हे आपल्या हातात काठी घेऊन आलेले होते. हातात काठी घेतलेले पुरुष म्हणजे महार जातीच्या पुरुषांचे प्रतिक होते.

सत्याग्रहींवर सनातन्यांचे अत्याचार झाले. जरी महाड नगरपालिकेने सरकारी अखत्यारीतील सर्व पाणवठे अस्पृश्यांना खुले केले असले, तरीही त्या पाणवठ्यांवर तसा कसलाही उल्लेख केला गेलेला नव्हता. त्यामुळे एवढ्या मोठ्या संख्येने अस्पृश्य जमा होऊनही त्यांनी आसपासच्या कोणत्याही पाणवठ्यावरून पिण्यासाठी पाणी घेण्याची हिंमत केली नाही. म्हणूनच या सभेसाठी आलेल्या लोकांच्या पाण्याच्या सोयीसाठी ४० रुपये किमतीचे पाणी उच्च जातीय हिंदूंकडून विकत घेण्यात आले होते. कारण सभेच्या ठिकाणी अस्पृश्यांना आसपासच्या पाणवठ्यावरून पाणी घेण्यास मनाई होती, हे आपण जाणताच की! डॉ.बाबासाहेब चवदार तळ्याचे पाणी पिऊन सभेपुरते ते रहात असलेल्या सरकारी बंगल्यावर परतले आणि इतर सर्व लोक सभेच्या मंडपात परत गेले. चवदार तळ्यावरून सर्वजण निघाल्यानंतर सुमारे दोन तासाच्या आतच महाड गावात एक अफवा उठली की, तळ्यातील पाणी बाटवल्यानंतर आता जमलेला जमाव वीरेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहे. धर्म धोक्यात आल्याची बोंब उच्च जातीय हिंदूंनी महाड गावभर पसरविली. त्यातून उच्च जातीय हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्या-काठ्या घेउन सभेच्या ठिकाणी आला व त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. हा उच्च जातीयांचा घोळका नंतर महाड शहरभर फिरून सर्व अस्पृश्यांना धमकावत होता. शिवाय आसपासच्या सर्व गावांमध्ये या सभेला आलेल्या सर्व अस्पृश्यांना धडा शिकवण्याबद्दल संदेश पोहोचवला गेला. त्यामुळे अनेक अस्पृश्यांना स्वतःच्या गावी पोहोचल्यानंतरही हिंसेला सामोरे जावे लागले. या सत्याग्रहाला गांधीजींनी पाठिंबा दिला आणि स्पृश्यांनी अस्पृश्यांवर अशाप्रकारे हिंसा करून चुक केली आहे, असे मत त्यांच्या यंग इंडियामध्ये प्रकाशित केले.

विरेश्वराच्या मंदिराच्या गुरवाने अस्पृश्यांनी विरेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे, अशी अफवा उठविल्यामुळे गावातील सनातनी हिंदुंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर अत्याचार केला. परंतु अहिंसा हे तत्त्व मानणाऱ्या डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनातनी हिंदूंविरूद्ध "हिंसा करू नका!" असा आदेश दिला होता. त्यामुळे एवढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिक लोकांपेक्षा जास्त संख्येने असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम ठेवला. त्याबद्दल गांधीजींनी सर्व सत्याग्रहींचे कौतुकही केले होते. नंतर दि.१९ मार्च १९४० रोजी डॉ.बाबासाहेबांनी महाडमध्ये चौदावा महाड सत्याग्रह दिन आयोजित केला. महाड शहरात त्यांचा मोर्चा व सभा झाली. या दिवशीं महाड नगरपालिका प्रेसिडेंट ॲड.विष्णू नरहरी खोडके यांनी एक समारंभ आयोजित करत त्यांना मानपत्र देऊन गौरविले. खोडके यांनी सन १९३१पासून त्यांच्या चळवळींना पाठिंबा दिला होता.

दलित महिलांचा मोठा सहभाग आणि बाबासाहेबांचे जीवतोड आवाहन या सत्याग्रहाचे वैशिष्ट्ये ठरले. या सत्याग्रहासाठी स्त्रियांचा सहभाग लक्षणीय असल्याने आणि आपली जात दाखवणारी कोणतीच लक्षणे आपल्या शरीरावर न बाळगण्याविषयी उपस्थित स्त्री-पुरुषांना खास आवाहन केले. त्यातच पुरुषांनाही हातात कायम काठी ठेवण्यासारखी चिन्हे बाळगण्याची आता गरज उरली नाही. तत्कालिक स्त्रिया गुडघ्यापर्यंतच तोकडे लुगडे नेसत असत. डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांना इतर उच्च जातीय स्त्रीयांसारखे पूर्ण टाच घोळ लुगडे नेसण्यास सुचविले. त्याची अंमलबजावणी लागलीच पुढच्या काही दिवसांतच घडून आली, हे विशेष! !! भारतीय सामाजिक सबलीकरण दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन तथा सुलेखन - केजीएन: श्री के.जी.निकोडे गुरूजी (से.नि.प्राथ.शिक्षक.) मु.पो.ता.गडचिरोली. फक्त दूरभाष- ७१३२७९६६८३.**

# भाजप पदाधिकाऱ्यांचं वरिष्ठांना पत्र, श्रीकांत शिंदे यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता

ठाणे जिल्ह्यातील कल्याण लोकसभा मतदारसंघ हा कळीचा मुद्दा बनत चालला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांचा हा मतदारसंघाचे आहे. सध्या महायुतीचा उमेदवार म्हणून त्यांच्याच नावाची चर्चा आहे. तर दुसरीकडे शिवसेना फुटीनंतर ठाकरे गटाने ही कल्याण लोकसभेला टार्गेट करत श्रीकांत शिंदेंच्या विरोधात तगडा उमेदवार देणार असल्याची घोषणा केली आहे. त्यात भाजप कार्यकर्त्यांची नाराजी दिसून येत असल्याने खासदार श्रीकांत शिंदे यांना मित्रपक्षातील अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. यातच आता दिवा भाजप मंडळच्या पदाधिकाऱ्यांनी कल्याण लोकसभा निवडणूक ही भाजपच्या कमळ चिन्हावरच लढवावी, अशी मागणी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. त्यामुळे शिंदे यांच्यापुढे आणखी एक आव्हान उभे केले आहे भारतीय जनता पार्टी दिवा शहरच्या वतीने दिव्यात नुकतीच एक बैठक पार पडली आहे. या बैठकीत दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, ठाणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य अशोक पाटील, नरेश पवार, विनोद भगत, जिल्हा चिटणीस विजय भोईर, सपना भगत, रोशन भगत, गणेश भगत यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या सर्व




पदाधिकाऱ्यांनी एकमताने यावेळी कल्याण लोकसभा निवडणुक ही भाजपच्या कमळ चिन्हावरच लढवावी, असा निर्णय घेतला आहे. तसे निवेदन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आलं आहे. या पत्राद्वारे कल्याण लोकसभा मतदारसंघात उमेदवार कोणीही असो पण चिन्ह मात्र कमळच असो अशी आम्ही मागणी करण्यात आली आहे भाजप कार्यकर्त्यांची नेमकी भूमिका काय?"या मतदारसंघात भाजपची मोठी ताकद आहे. येथे भाजपचे तीन आमदार आहेत. त्यातील एक मंत्री आहे. तसेच कल्याण ग्रामीण, डोंबिवली, दिवा मतदारसंघात देखील भाजपची ताकद मोठी आहे. मतदारांचा कौल देखील भाजपच्या बाजूने आहे. अब की बार 400 पार हे जे ध्येय्य आहे ते कमळ चिन्हावरच शक्य होईल. बाकी कोणत्या चिन्हावर शक्य होणार नाही. त्यामुळे आता फक्त कमळच", असे सचिन भोईर यांनी म्हटले आहे. यामुळे भाजप आता येथे आपला उमेदवार देतो की शिंदे यांना दिवा येथील भाजपच्या पदाधिकाऱ्यांची मनधरणी करावी लागते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# भाजप-मनसे युतीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता, पाहा कोण असेल मनसेचा उमेदवार?

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

भाजप आणि मनसेच्या युतीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे स्वत: दिल्लीला रवाना झाले आहेत. लोकसभा निवडणुकीसह आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीवरही फैसला होईल. महायुतीत भाजपला सोबत घेण्याच्या निर्णय अंतिम टप्प्यात असून त्यासाठी राज ठाकरे दिल्लीला रवाना झालेत. विशेष म्हणजे संध्याकाळीच फडणवीसही दिल्लीतही दाखल झालेत. त्यामुळं भाजप-मनसे युतीसह मनसेला महायुतीत घेण्यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल. मनसे अध्यक्ष राज ठाकरे दिल्लीला रवाना झालेत. राज



ठाकरेंसोबत त्यांचे पुत्र अमित ठाकरेही सोबत आहेत. विशेष म्हणजेच गेल्या 3-4 दिवसांतला राज ठाकरेंचा हा दुसरा दिल्ली दौरा आहे, या दौऱ्यातही त्यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाशी भेटलेत. लोकसभा निवडणुकीआधी मनसेला सोबत घेण्यासाठी काही दिवसांपासून जोरदार प्रयत्न सुरु आहेत.

मुंबईतील लोकसभेची 1 जागा देऊन आणि इतर वाटाघाटी करुन मनसेला सोबत घेण्यावर भाजपची चर्चा सुरु आहे. दक्षिण मुंबईची जागा मनसेला देऊन त्यांना महायुतीत घेण्यावर शिक्कामोर्तब होईल. दक्षिण मुंबईत सध्या ठाकरे गटाचे अरविंद सावंत खासदार असून मनसेकडून बाळा नांदगावकर महायुतीचे मनसेकडून उमेदवार असू शकतात. भा बिहारमध्ये एनडीएची जागावाटप पूर्ण झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात देखील लवकरच जागावाटपाची घोषणा होऊ शकते. कारण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे हे देखील दिल्लीत आहे.

आज रात्री मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि गृहमंत्री अमित शाह यांची बैठक होणार असल्याची देखील माहिती पुढे येत आहे. त्यामुळे महायुतीत आणखी एक पक्ष वाढण्याची शक्यता आहे. जप-मनसे युतीवरुन स्वत: फडणवीसांनीही गेल्या 2-4 दिवसांत सकारात्मकच प्रतिक्रिया दिलेली आहे. गेल्या काही महिन्यांपासून स्वत: राज ठाकरे असो की मनसेचे नेते भाजपवर टीका टाळतायत.. आणि राज ठाकरेंनीही यापुढे मनसेचा प्रवास सत्तेच्या दिशेनं असेल असं म्हटलेलंच आहे.राजकारणात कधी काय होईल हे सांगता येत नाही. महायुतीत भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी आहे. आता मनसेचा समावेश झाल्यास महायुतीची ताकद आणखी वाढेल.

# ग्रामीण भागातील खेळाडूंना पीपीएल प्रीमिअर लीगच्या माध्यमातून मैदान उपलब्ध केले- बंडू मस्के

वादळवार्ता/किल्लेधारूर

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथे माजी सरपंच तथा संजय गांधी निराधार योजनेचे धारूर तालुका समितीचे सदस्य बंडू मस्के व तारकेश्वर क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे आयोजन करण्यात आले आहे, या पीपीएल प्रीमिअर लीगचा प्रारंभ उत्साहात करण्यात आला. ग्रामीण भागामध्ये प्रथमच इतक्या मोठ्या रकमेचे बक्षीस व क्रिकेट सामन्याचे यूट्यूब चॅनलवर लाईव्ह प्रक्षेपण असणाऱ्या पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे माजी सरपंच बंडू मस्के व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे धारूर तालुकाध्यक्ष अमोल जगताप यांच्या शुभहस्ते उद्घाटन तारकेश्वर क्रीडांगणामध्ये संपन्न झाले. पीपीएल प्रीमिअर लीग मध्ये एकूण दहा क्रिकेटचे संघ सहभागी झालेले आहेत, या क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाला तब्बल ५१००० रुपयांचे बक्षीस माजी सरपंच तथा संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य भोगलवाडी जिल्हा परिषदेचे भावी सदस्य संबोधले जाणारे बंडू मस्के यांच्यावतीने दिले जाणार आहे तर द्वितीय क्रमांकाचे ३१००० रुपयांचे बक्षीस बीड जिल्हा कोळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य गोरख पुर्णे यांच्या वतीने ठेवले आहे तर धारूर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष सटवा अंडील यांच्या वतीने तृतीय क्रमांकाचे ११००० रुपयांचे बक्षीस आहे तसेच स्व. गोकुळ टायर्स प्रो.भागवत अंडील यांच्या वतीने चतुर्थ क्रमांकाचे ७७०० रुपयांचे बक्षीस विजयी संघाला दिले जाणार आहे. राष्ट्रवादीचे युवा नेते सुरेश अंडील ऑरेंज कॅप तर गणेश धर्मराज मुंडे मॅन ऑफ द सिरीज सायकल तर सुरेश गणेश अंडील फायनल मॅन ऑफ द मॅच २१०० रु.तसेच अक्षय भैय्या मित्र मंडळ धारूर प्रति मॅच मॅन ऑफ मॅच ट्रॉफी व ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटोळे प्रति सामना हॅट्रिक करणाऱ्या बॉलरला ११०० रू.आदींनी बक्षीस ठेवण्यात आलेली आहेत. पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे संयोजक म्हणून अमोल मस्के, माणिक मस्के,उमेश अंडील, दिनेश अंडील,भागवत मुंडे, संतोष मुंडे,दादासाहेब अंडील, गोविंद रुद्रे,अनंत बिल्पे,पवन पूर्णे,माणिक मुंडे,भागवत साक्रुडकर,शैलेश अंडील,शुभम अंडील,महादेव वरकले,शंभूदेवा मुंडे,अशोक वरकले,अक्षय सूर्यवंशी,वैजनाथ रुद्रे,अमोल शिंदे,बंडू मुंडे काम पाहत आहेत. पीपीएल प्रीमिअर लीगची माहिती व प्रसिद्धी बाजीराव अंडील,प्रदीप अंडील,रमेश मुंडे,मेघराज मुंडे यांनी केली आहे.पी.पी.एल प्रीमियर लीगच्या उद्घाटन प्रसंगी तालुकाध्यक्ष अमोल जगताप तसेच उपसरपंच राहुल चव्हाण,बापू चव्हाण, माजी सरपंच बंडूभाऊ मस्के,राष्ट्रवादी युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष सटवा अंडील, ग्रामपंचायत सदस्य धर्मराज मुंडे,युवा नेते सुरेश अंडील,ग्रामपंचायत सदस्य माणिक मस्के या सर्व मान्यवरांचे तारकेश्वर क्रीडा मंडळ व संयोजक समितीने शाल, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले या प्रसंगी माजी सरपंच बंडू मस्के यांनी पीपीएल प्रीमिअर लीगच्या पाठीमागीलची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की,आजचे तरुण वर्ग हा मोबाईलच्या जगात व्यस्त झाला आहे मोबाईलवर गेम खेळणे,युट्युब ,फेसबुक,इंस्टाग्रामच्या विश्वातून खेळाच्या मैदानात आणण्यासाठी व ग्रामीण भागातील खेळाडूंना पीपीएल प्रीमिअर लीगच्या माध्यमातून मैदान उपलब्ध करून देऊन पहाडी पारगाव प्रीमिअर लीगचे आयोजन केले असे आपले मत त्यांनी उद्घाटनाप्रसंगी व्यक्त केले त्यानंतर संघर्ष चिंचाळा विरुद्ध एकता इलेव्हन वडवणी या संघातील खेळाडूंची ओळख करून मान्यवरांनी घेतली व टॉस करुन उद्घाटन झाले असे जाहीर केले व सामन्याला प्रारंभ केला.या प्रसंगी दिनेश अंडील,युवा उद्योजक उमेश अंडील,प्रदीप अंडील,रमेश मुंडे,फोटोग्राफर दादासाहेब अंडील,मेघराज मुंडे तसेच धारूर व वडवणी तालुक्यातील मोठ्या प्रमाणात तरुण वर्ग उपस्थित होता पीपीएल प्रीमिअर लीग यशस्वी करण्यासाठी आयोजक तारकेश्वर क्रीडा मंडळ व संयोजक समिती परिश्रम घेत आहे.

# इक्रा हायस्कूल उरण येथे मतदान जनजागृती कार्यक्रम संपन्न...

**उरण/विठ्ठल ममताबादे**

भारतीय निवडणूक आयोगाच्या स्वीप उपक्रमा अंतर्गत नुकताच उरण तालुक्यातील इक्रा हायस्कूल मध्ये मतदान जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न झाला. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.निवडणूक कोणतीही असो या निवडणुकीत मतदान करून आपली लोकशाही बळकट करायला हवी. कोणत्याही अमिषाला बळी न पडता निर्भयपणे आपण मतदानाचा अधिकार बजवायला हवा. “मेरा व्होट मेरी पहचान” अशी ओळख लोकशाहीच्या सर्वात मोठ्या सणात



म्हणजे निवडणुकीत मतदाराने करायला हवी अशा प्रकारची मतदान करण्या बाबत जनजागृती उपस्थित पालक वर्गात करण्यात आली. या वेळेस इक्रा हायस्कूलचे १६० हून अधिक पालक उपस्थित होते.या उपस्थित पालक वर्गाला मतदान का करावे ? या बाबत उरण तालुका गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे तसेच मार्गदर्शक पदवीधर शिक्षक मच्छिंद्रनाथ म्हात्रे व किशोर पाटील यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास नवीन शेवे केंद्राचे केंद्र प्रमुख श्री. पवार सर,इक्रा हायस्कूलच्या प्राचार्य फरहत तुंगेकर,सहाय्यक शिक्षिका अंशू सहतीया,मनिषा मुसळे,पालक प्रतिनिधी तजीन सोंडे,सुंबुळ तुंगेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

# राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन करावे-जिल्हाधिकारी

**दैनिक वादळ वार्ता बीड/परवेज पटेल**

बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात ३९-बीड लोकसभा मतदार संघात आदर्श आचार संहिता लागू झाली असून राजकीय पक्षांनी आणि प्रतिनिधीनी त्याच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले जिल्हाधिकारी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीची वेठक झाली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी अंजू निमसरकर आदी उपस्थित होते यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले, निवडणूकीसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करतांना उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात ५ प्रतिनिधीनां प्रवेश देण्यात येईल यासाठी सोबत अणावयाची वाहने, आदीप्रसंगी आचार संहितेनुसार बंधने पाळली जावीत. राजकीय पक्षाशी निगडित विविध मंजुरी एक खिडकी मधून दिली जाणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यासह राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका त्यांची धोरणे कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशी संबंधित असावी. आणि उपद्रव रहित जीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे त्या अधिकाराचे निवडणुकीच्या काळात पण जतन व्हावे अशी अपेक्षा जिल्हाधिकारी यांनी यावेळी



व्यक्त केली. सभेसाठी लागणाऱ्या प्रत्येक गोष्टींची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. सभांमध्ये सुव्यवस्था बिघडणार नाही यासाठी पोलीस बंदोबस्तची मदत घ्यावी .मतदानाच्या दिवशी उमेदवार व त्यांची निवडणूक मतदान प्रतिनिधी याव्यतिरिक्त फक्त निवडणूक आयोगाकडून वैद्य प्राधिकार पत्र मिळालेल्या व्यक्तींनाच कोणत्याही मतदान कक्षा प्रवेश करता येईल इतर व्यक्ती कोणीही उच्चपदस्थ असली तरी तिला अटीतून सूट मिळणार नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या जिल्ह्यातील काही शासकीय इमारतीचे बांधकाम होत असल्यामुळे लगतच्या शाळेत निवडणुकीशी निगडित कार्यक्रम होतील याची माहिती पण जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिली.

बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात १३ मे ला निवडणूक होणार असून हा काळ विद्यार्थ्यांसाठी सुट्ट्यांचा असतो त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक लोकांनी आणि विशेषत: तरुणांनी भाग घ्यावा असेही आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. यावेळी भारतीय निवडणूक आयोगाने दिलेल्या सोयी सुविधेबाबतचीही माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली या अंतर्गत दिव्यांगांसाठी तसेच 80 वर्षापेक्षा अधिक वयोगटातील व्यक्तींसाठी घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध असेल. मतदान केंद्रावर व्हीलचेअरसह मूलभूत सुविधा असतील याबाबतही सांगितले. यावेळी दिव्यांग बूथ तसेच महिलांचे बूथ तयार केले जातील. मात्र अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर येऊन मतदान करावे आणि इतरांनाही प्रोत्साहन करावे यासाठी राजकीय पक्षांनी त्याप्रमाणे प्रचार प्रसार करावा अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केल्या. काही मतदाराचे दोन ठिकाणी नावे असतात, अशा मतदारांनी कुठल्याही एका ठिकाणी नाव नोंदवावे यासाठी राजकीय पक्षांनीही याबाबत मतदारांना जागृत करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले जिल्हा पोलीस अधीक्षक श्री ठाकूर यांनी मतदारसंघात स्टार प्रचारकांच्या प्रचार सभा, प्रचार आदीवेळी कायदा व सुव्यवस्था भंग होऊ नये यासाठी काळजी घ्यावी, असे सांगितले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सोळंके यांनी निवडणूक काळात भरारी पथके, निगराणी पथके कार्यरत असून आचार संहिता भंगाच्या तक्रारीचा तातडीने दखल घेण्यात येईल असे सांगितले याप्रसंगी निवडणुकीची तयारी, निवडणूक कार्यक्रमाचा दिनांक देऊन प्रचार व प्रसिध्दीसाठी सार्वजनिक मालमत्तेच्या विदुपीकरणापासून संरक्षण आदीसाठी नियम यांची माहिती दिली. तसेच आदर्श आचार संहिता मार्गदर्शक तत्वांच्या माहिती देण्यात आल्या. बैठकीसाठी आम आदमी पक्ष, शिवसेना शिंदे गट तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गट, एम आय एम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कांग्रेस, बहुजन समाजवादी पक्ष, कम्युनिष्ट पक्ष. राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गट, आदी पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राजकीय पक्षांना निवडणुकीशी संबंधित माहिती पुस्तिका देण्यात आली

# महाविकासआघाडीचा फॉर्म्युला फायनल, वंचितला सोबत घेणार

**वादळवार्ता/नागपूर**

लोकसभा निवडणुकीसाठी जागावाटप शेवटच्या टप्प्यात आहे. महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला फायनल झाला असून आता घोषणा बाकी आहे. वंचित आघाडीची आणखी 2 दिवस महाविकास आघाडी वाट पाहणार असल्याचं कळतंय. तर ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांनी आपले उमेदवार निश्चित केलेत. महाविकास आघाडीत शनिवारीच जागा वाटपाबाबत अंतिम बैठक झाली. आणि याच बैठकीत फॉर्म्युला आणि 1-2 जागांचा वाद सोडला तर जागा वाटपही झालंय. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार. ठाकरे गट 22



जागांवर लढणार आहे. काँग्रेस 16 जागांवर उमेदवार देणार तर शरद पवार गटाला 10 जागा मिळणार असल्याची माहिती आहे. ठाकरे गटाकडून सुरुवातीपासूनच 22 जागांचा दावा होता. त्यानुसार ठाकरे गटाला 22 जागा मिळेल असं दाट शक्यता आहे. आणि ठाकरेंनी उमेदवारांची निश्चिती केली असून फक्त घोषणाच बाकी आहे

# न्यायालयाच्या नुतन वास्तूचे न्यायमुर्तींच्या हस्ते उदघाटन थाटात संपन्न भव्य ईमारत व सोयीसुविधा पक्षकारासाठी-न्यायमुर्ती रविंद्र जोशी !

**वादळवार्ता/शिरूरकासार**

येथील दिवानी व फौजदारी न्यायालयाच्या नुतन वास्तूचे रविवारी उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती राजेंद्र अवचट यांचे हस्ते संपन्न झाले. प्रमुख उपस्थितीत उच्च न्यायालय मुंबई न्यायमुर्ती रविंद्र जोशी तर अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर होते . रविवारी सकाळी साडेदहा वाजता उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती राजेंद्र अवचट यांचे हस्ते भव्य ईमारतीचे उदघाटन संपन्न झाला .नंतर मान्यवर व्यासपिठावर विराजमान झाल्यावर आयडीएल ईंग्लीश स्कुलच्या बालचमुने स्वागत गिताने मान्यवरांचे स्वागत केले .दिपप्रज्वलना ऐवजी झाडांच्या रोपट्यांना मान्यवरांच्या हस्ते पाणी घातले गेले .सत्कारात देखील शाल श्रीफळाबरोबर झाडाच्या रोपाला प्राधान्य दिले गेले . उदघाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा




व सत्र न्यायालयाचे न्यायमुर्ती आनंद यावलकर यांनी केले तर या ईमारतीत असलेल्या सर्व सुविधा सांगितल्या . वकिल संघाचे अध्यक्ष ॲड भारत जायभाये यांनी शिरूर कासार न्यायालयाच्या ईमारत निर्माण साठी अडचणी सांगुन त्या दूर करण्यासाठी व त्यात सुधारणा करण्यासाठी केलेले प्रयत्न सांगितले . उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश विश्वनाथ जाधव यांनी मोलाचे मार्गदर्शन करतांना काही बदल सुचवले त्यात सत्कार हा व्यापक नसुन तो प्रातिनिधीक स्वरूपाचा असावा तसेच राज्य घटनेचे पुजन करण्यात यावे असेही सुचवले . प्रमुख अतिथी न्यायमुर्ती रविंद्र जोशी यांनी ही भव्य वास्तू व त्यातील सुविधा या प्रामुख्याने पक्षकारासाठी असल्याचे सांगुन या ईमारतीचे हे सौंदर्य सांभाळण्याची जबाबदारी सर्वांची आहे ,स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घ्यावी ,न्यायप्रक्रियेत वकिलाचा फार महत्वाचा वाटा असतो ,हे जनतेचे व कायद्याचे राज्य असुन ते संविधानावर चालते असेही सांगितले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वकिल संघाचे अध्यक्ष ॲड भारत जायभाये व त्यांचे सर्व विधिज्ञ सहकारी ,सार्वजनिक बांधकाम खात्याचे अभियंता मार्कंडे ,शिरूर कासारचे अभियंता कृष्णा पानसंबळ ,गटविकास अधिकारी,तहसिलदार ,वारणीच्या सरपंच प्रियंका केदार , नगरपंचायतचे मा.नगराध्यक्ष रोहीदास पाटील, महावितरण यांनी अथक परिश्रम घेतले त्यांचा सर्वांचा यथोचित सत्कार करण्यात आला . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस टी सहारे व श्रीमती पी जी ईनामदार यांनी केले तर आभार शिरूर कासार न्यायालयाचे न्यायमुर्ती अमितकुमार मनगिरे यांनी आभार मानले .

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

## वंचित'ने प्रणिती शिंदे यांना डिवचलं,



वंचित बहुजन आघाडीने काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांना डिवचलं आहे. "तुम्ही ठीक आहात? आम्हाला समजले आहे की, इतके दिवस थांबल्यानंतरही तुमचे तुमच्या पक्षासोबत जमत नाही. नवीन पक्षाचा मुहूर्त कधी आहे?", असा सवाल वंचित बहुजन आघाडीने केला आहे. वंचित बहुजन आघाडीने ट्विटरवर प्रणिती शिंदे यांचा भाजपच्या पोस्टरवर फोटो लावत निशाणा साधला आहे. "आम्ही सत्तेचा दुरुपयोग करण्यासाठी किंवा जनतेच्या पैशाने दक्षिण आफ्रिकेत वैयक्तिक मालमत्ता खरेदी करण्यासाठी निवडणूक लढवत नाही. आम्ही महाराष्ट्रातील वंचित – बहुजनांच्या आकांक्षा आणि प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडणुका लढवतो", असं वंचित बहुजन आघाडीने ट्विटरवर म्हटलं आहे.

# ऊसतोड मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे धारूर व केज तालुक्यात विविध उपक्रम.

**वादळवार्ता/किल्लेधारुर**

मराठवाडा ग्रामिण विकास संस्थेचे वतीने धारुर व केज तालूक्यातील ऊसतोड मजुरांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले असून धारूर तालुक्यातील घागरवाडा येथे नुकताच सर्वेक्षण करून ऊस तोड कामगारांना मार्गदर्शन केले.



मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजी नगर ही संस्था गेल्या २९ वर्षांपासून ग्रामीण विकासाबरोबर विविध समाजात विविध प्रश्नाला सोबत घेऊन काम करत आहे. धारुर तालुक्यातील गावांमध्ये प्रकल्प ओळख कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला धारूर पंचायत समितीचे माजी सभापती हनुमंत नागरगोजे ,सरपंच गोपाळ वेताळ, ऊसतोड कामगार कुटुंबातील सदस्य, अंगणवाडी, पुरुष बचत गट, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य ग्राम बाल संरक्षण समिती सदस्य, पाणलोट विकास समिती सदस्य व गावातील इतर ग्रामस्थ उपस्थित होते. प्रकल्प ओळख कार्यक्रमांमध्ये गावांमध्ये ऊसतोड कामगाराची नोंदणी व ऊसतोड कामगार समिती स्थापना करण्याबाबत चर्चा करण्यात आली ,याचबरोबर ऊसतोड कामगारांच्या मुलासोबत चिल्ड्रन ग्रुप्स स्थापन करण्यात आला. या गावांमध्ये अंदाजे २५० ते ३०० कुटुंब ऊस तोडी करता स्थलांतर करतात .परंतु प्रत्यक्षात मात्र जिल्हा परिषद वेबसाईटवर फक्त ४१ मजुरांची नोंद आहे. ऊसतोड कामगार नोंदणीचे महत्त्व सांगून त्यांना स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड महामंडळ यांच्या विविध योजना याबाबत माहिती सांगण्यात आली. प्रकल्प ओळख कार्यक्रमात धारूर पंचायत समिती सभापती हनुमंत नागरगोजे यांनी गावातील ऊसतोड कामगार यांना नोंदणी करण्याबाबत आवाहान केले. हे विविध उपक्रम राबविण्यासाठी तेलगाव रोड धारूर या ठिकाणी संस्थेचे कार्यालयं असून या कार्यालय अंतर्गत प्रकल्प समन्वयक संतोष रेपे, गाव स्वयंसेवक प्रकाश काळे, शिवशंकर माने, सुनिता विभूते, निवेदिता बालमारे, राज करे, लायझनिंग ऑफीसर एच पी देशमुख इ व्यक्ती कार्यरत आहेत. तर प्रकल्प संचालक आप्पासाहेब उगले यांचे या कामासाठी वेळोवळी मार्गदर्शन लाभत आहे.

## राणी बागेतील पेंग्विनची फॅमिली वाढली, आता घराचा विस्तार होणार

**वादळवार्ता**

मुंबईच्या भायखळा येथील राणी बागेतील आकर्षण असलेले परदेशी पेंग्विन पक्षी पाहायला मुंबईकरांची मोठी गर्दी होत असते. या पेंग्विनची संख्या वाढत असल्याने त्यांच्या घराचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या पेंग्विनच्या घराला 18 पेंग्विनच्या रहीवासासाठी मोठे करण्याची योजना आहे. यासाठी अत्याधुनिक टनेल एक्वेरियम देखील बांधले जाणार आहे. या बांधकामासाठी 60 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हे नवीन विस्तारीत घरकुल पुढील वर्षी 2025 पासून प्रेक्षकांसाठी खुली होणार आहे या विस्तार योजनेचे मुख्य आकर्षण टनल एक्वेरियम असणार आहे. सुरुवातीला तत्कालिन पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी साल 2022 मध्ये घोषीत केलेल्या अन्य एका फिश एक्वेरियमच्या प्राथमिकतेमुळे पेंग्विनच्या घरकुल विस्ताराला उशीर झाला. आता फिश एक्वेरियम रद्द करण्यात येऊन टनल एक्वेरियमला हिरवा झेंडा मिळाला आहे. या एक्वेरियममध्ये दोन वॉक-थ्रु ऐक्रेलिक बोगदे आणि एक घुमटाच्या आकाराचे प्रवेशद्वार असणार आहे. एक बोगदा मुंगा मासळीला पाहण्यासाटी तर दुसरा खोल समुद्रातील जीव दाखविण्यासाठी असणार आहे. दहा लाख लिटर जीव रक्षक प्रणालीची देखील निर्मिती केली जाणार आहे.

## मनोज जरांगे पाटलांची धनलक्ष्मी पतसंस्थेच्या गेवराई शाखेला सदिच्छा भेट

**वादळवार्ता/गेवराई**

मराठा आरक्षणाचा राज्यात लढा उभा करणारे मराठायोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी धनलक्ष्मी पतसंस्थेच्या गेवराई येथील मुख्य कार्यालय शाखेला सदिच्छा भेट दिली. यावेळी पतसंस्थेच्यावतीने जरांगे पाटील यांचा यथोचित संन्मान करण्यात आला. दरम्यान जरांगे पाटील यांनी पतसंस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी जीवाची बाजी लावून लढणारे मनोज जरांगे पाटील हे शनिवारी गेवराई तालुका दौऱ्यावर होते. दरम्यान शहरातील गजानन महाराज मंदिरात स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा वै.ह.भ.प. नगदनारायण महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त किर्तन महोत्सव समारंभाला मनोज जरांगे पाटील यांनी हजेरी लावल्यानंतर त्यांनी गेवराई येथील नवीन बसस्थानकनजीक असलेल्या धनलक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालय शाखेला वेळात वेळ काढून सदिच्छा भेट दिली. यावेळी जरांगे पाटील यांचा धनलक्ष्मी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद नरसाळे यांच्यासह संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी धनलक्ष्मी पतसंस्थेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी महेश दाभाडे, राजेंद्र मोटे, सचिन मोटे, महेश बेदरे, धर्मराज आहेर, नानासाहेब पवार, महेश खरात, पत्रकार विनोद पौळ, प्रदिप डोंगरे, बाळासाहेब घाडगे, सोमनाथ लोंढे, अविनाश गवळी, नंदकुमार पौळ, पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक गोकुळ काळे, कर्मचारी कृष्णा बनसोडे, मोनिका वादे आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सत्तेचा प्रकाश तरीही वडवणी, धारूर रस्ता प्रवाशांना सापडेना!

**दैनिक वादळ वार्ता**

माजलगाव/ प्रतिनिधी
माजलगाव मतदार संघातील वडवणी, धारूर डोंगरी भागात येणारी तालुके आहेत. या दोन तालुक्यांना जोडणारा राज्य मार्ग २३२ असून हा रस्ता मात्र सध्या खड्ड्यात हरवला असल्याने या मार्गावरून वाहतूक जवळपास बंद झाल्यासारखी स्थिती आहे. यामुळे दळणवळण थांबल्याने विकासाला ब्रेक लागला आहे. वडवणी तालुक्याचा विकास व्हावा अशी इच्छा असेल तर वडवणी, धारूर रस्ता होणे आवश्यक आहे. परंतु याकडे कोणाचेच लक्ष दिसत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघात माजलगाव, धारूर, वडवणी या तीन तालुक्यांचा समावेश आहे. माजलगाव तालुका हा पहिल्यापासून सदन असून, दळणवळणाचा विचार केला तर शहरातून कल्याण- विशाखापट्टणम, शहर जवळून खामगाव - पंढरपूर असे दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. धारूर, वडवणी शहरातून प्रत्येकी एक राष्ट्रीय महामार्ग जातात. परंतु ग्रामीण भागाचा विचार केला तर अनुभव वाईटच आहे. या मतदार संघातील जवळपास ४० गावे अन् वडवणी, धारूर तालुका मुख्यालय असलेली शहरे राज्य मार्ग २३२ ने जोडली जातात. हा मार्ग लोखंडी सावरगाव फाटा, आडस, धारूर, चिंचवड, वडवणी, ताडसोन्ना, पिंपळनेर, कुक्कडगाव, पाचेगाव, पाडळसिंगी असा ८४ किलोमीटरचा आहे. दोन वर्षांपूर्वी या रस्त्याचे दोन टप्पे पाडण्यात आले. यात पहिल्या टप्प्यात गेवराई मतदार संघाची आमदार लक्ष्मण पवार यांनी १४५ कोटीचा निधी मंजूर करून घेतला अन् त्याचे काम ही सध्या गतीने सुरू आहे. दुसरा टप्पा हा वडवणी ते लोखंडी सावरगाव फाटा असा आहे. परंतु वर्ष होऊन गेले, बजेट ही घोषित झाले पण या रस्त्यासाठी छदामही आल्याची बातमी वाचण्यात आली नाही. यामुळे या रस्त्यावर असलेल्या गावकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे. हा रस्ता मागील जवळचा एक तपापासून खड्ड्यात हरवला आहे. यामुळे सत्तेचा 'प्रकाश'असूनही प्रवाशांना रस्ता सापडत नाही. यामुळे हा रस्ता व्हावा अशी नागरिकांची नेहमी ओरड असते. परंतु याकडे ना आमदाराचे लक्ष ना खासदारांचे त्यामुळे हा राज्यमार्ग अडगळीत पडला आहे. वडवणी तालुक्याचा विकास व्हावा असं खरंच कोणाला वाटत असेल तर हा राज्य रस्ता होणे गरजेचे असून दळणवळण वाढवून विकासाला चालना मिळेल अशी जनतेची चर्चा आहे.

रमेश आडसकर गप्प का? आरणवाडी साठवण तलाव संबंधी आंदोलन सुरू असताना रमेश आडसकर यांनी शेतकऱ्यांची बाजू घेत आंदोलनात सहभागी झाले. टोकाची भूमिका घेत मागणी मान्य झाली नाही तर जलसमाधी घेणार असल्याची म्हटले होते. मग हा रस्ता माजलगाव मतदार संघातून जातो मग यावर ते हाताची घडी तोंडावर बोट अशी नेहमीच भूमिका राहिली आहे. यामुळे रमेश आडसकर गप्प का? की, असा प्रश्न वडवणी, धारूर तालुक्यातील शेतकरी, सामान्य जनतेतून विचारला जात आहे.

# मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे ?

## मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद

**वादळवार्ता / मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांना मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतचा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी अतिशय महत्त्वाची माहिती दिली. "मराठा आंदोलकांवर जे गुन्हे दाखल आहेत ते पडताळणी नुसार मागे घेण्यात येत आहेत. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे. आंदोलन, सभा, रॅली काढल्या म्हणून गुन्हे दाखल झाले आहेत. रस्ता रोकोवरुन गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्ह्यांची पहिल्या टप्प्यात स्क्रुटीनाईज सुरु आहे. सरकार पूर्ण सकारात्मक आहे. जे नॉन सिरियस गुन्हे आहेत ते सरकारने काढण्याचा निर्णय आचारसंहिता लागू होण्याच्या आधीच घेतलेला आहे. त्यामुळे त्याची छाननी सुरु आहेत, ज्यामध्ये जीवितहानी आणि वित्तहानी नाही त्यांचं वर्गीकरण केलं जाईल. जे गंभीर गुन्हे आहेत, ज्यात जीवितहानी, वित्तहानी आहे, मालमत्तेचं नुकसान झालं आहे, त्यांना दुसऱ्या क्रायटेरियात बसवून सकारात्मक मार्ग काढणार आहोत. छोटे गुन्हे काढण्याचा सरकार अगोदर घेतला आहे", अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

"आपण मराठा नेते मनोज जरांगे यांच्या मागणीप्रमाणे न्यायमूर्ती शिंदे यांच्या नेतृत्वात समिती नेमली. मराठा आरक्षण 10 टक्के देण्याचा निर्णय घेतला होता. यासाठी विशेष अधिवेशन घेऊन मराठा आरक्षण दिलं. या आरक्षणाचा लाभ मराठा समाजाच्या तरुणांनी घेतला पाहिजे. आता पोलीस भरती सुरु आहे. त्यांना आरक्षणाचा फायदा होईल. कोर्टात काही लोकं गेली होती. पण कोर्टाने मराठा आरक्षणावर कोणत्याही प्रकारची स्थगिती आणली नाही. राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात कॅव्हेट फाईल करुन ठेवलेलं आहे. त्यामुळे आम्ही कायद्याच्या चौकटीत टिकणारं मराठा आरक्षण दिलं आहे. कुणबी प्रमाणपत्र देण्याचं काम सुरु आहे", अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.




'आम्ही खरंच डिलर आहोत' काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल इंडिया आघाडीच्या बैठकीत महाराष्ट्र सरकारमधील मंत्र्यांवर निशाणा साधला होता. महाराष्ट्र सरकारमधील मंत्री डिलर आहेत, असा आरोप त्यांनी केला होता. त्यांच्या या आरोपांना एकनाथ शिंदे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत उत्तर दिलं. "जम्मू-काश्मीरमध्ये महाराष्ट्र भवन होऊ देणार नाही, असं फारुक अब्दुल्ला म्हणाले. उद्धव ठाकरे त्यांच्या बाजूला बसले. त्यांना बोलायला फक्त पाच मिनिटे दिले. आम्ही छातीठोकपणे बोलत गेलो. आम्ही सत्तेसाठी भूमिका बदलणारे नाहीत. शिवसेनेला एकेकाळी शत्रू मांडणारे काँग्रेस ठाकरेंसोबत आहे. हे पॉलिटिकल कॉम्प्रमाईज होतं", असं शिंदे म्हणाले. "आम्ही खरंच डिलर आहोत. कारण शेतकऱ्यांच्या हितासाठी, ज्येष्ठ, तरुणांना न्याय देण्यासाठी आम्ही डील केले. काँग्रेस सरकारच्या काळात किती घोटाळे आले. आता मोदींच्या काळात एकही घोटाळा आला नाही", असं एकनाथ शिंदे म्हणाले.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )